# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


MERC/ADM/RTI/039/2023/ 0173 Dt. 18.04.2023

प्रति,
श्री. बाळू लहु उगले,
८०५, ओशिनिया ब, कासा रिओ,
लोधा पलावा, कल्याण-शीळ रोड,
डोंबिवली (पूर्व), ता. कल्याण,
जि. ठाणे, पिन - ४२१२०४.

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २०.०३.२०२३ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.२०.०३.२०२३ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | वर्ष २०१२ पासून आजतागायत मा. आयोगातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना मिळणारे भत्ते व इतर सोई सुविधा यावर प्रत्येक अधिकारी निहाय व प्रत्येक वर्षनिहाय किती रक्कम (रूपये) खर्च केला गेला आहे? तसेच सदर भत्ते व इतर सोई-सुविधा यांचा मंजुरीसाठीच्या सादर केलेल्या तत्सम फाईल व इतर सर्व कागदपत्रांच्या नस्ती यांचा तपशील व नेमक्या कोणत्या आणि काय काय सोई सुविधा यांचा लाभ मिळाला आहे? याबाबतची सर्व साक्षांकित कागदपत्रे मिळावीत. | सन २०१२ ते आजतागायत या कालावधीतील माहिती आयोगाच्या कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती मोठया प्रमाणात असल्यामुळे आपण आयोगाच्या कार्यालयात येऊन प्रत्यक्ष त्याची तपासणी करावी व आपणांस आवश्यक असलेली कागदपत्रे माहितीचा अधिकार (फी आणि खर्च विनियमन) नियम, २००५ चे कलम ४ मधील खंड (अ) नुसार प्रती पृष्ठ रु.२/- प्रमाणे उपलब्ध करण्यात येईल. **<br><br>**टिप :** कार्यालयात तपासणीला येण्यापूर्वी २ दिवस आधी अवगत करावे. |
| २ | माझे ५० दिवसापुर्वीच्या म्हणजे दिनांक २५ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या पत्रावर केलेली कारवाईबाबतची माहिती, सदर पत्रातील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजुरी व इतर सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. | यासंबंधीत माहितीबाबत कार्यालयामार्फत कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे सद्यस्थितीत माहिती उपलब्ध करून देता येणार नाही. कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर माहिती उपलब्ध करून देण्यात येईल. |
| ३ | माझे ४८ दिवसापुर्वीच्या दिनांक २७ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या जेष्ठता सूचीच्या आक्षेपाच्या पत्रावर केलेली कारवाईबाबतची माहिती. सदर पत्रातील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजूरी | |

| | | |
|---|---|---|
| | व इतर सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. | |
| ४ | माझे दोन महिन्यापूर्वीच्या दिनांक १६ जानेवारी, २०२३ रोजीच्या मा. आयोगाच्या सचिवांना पाठविलेल्या ईमेल च्या अनुषंगाने केलेल्या कारवाईबाबतची माहिती, सदर ईमेल मधील मागितलेली माहिती व त्यासंदर्भात सादर केलेल्या प्रशासन विभागाच्या तत्सम नस्ती, फाईल व आयोगाची मंजुरी, माझा पगार अदा करण्यात आलेली दिरंगाईची कारणे, यात संबंधित दोषी अधिकारी व त्यावर झालेली कारवाई याबाबत व इतर सर्व माहिती आणि कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती मिळाव्यात. | दि.१६.०१.२०२३ रोजीच्या ईमेलच्या अनुषंगाने कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही. |

**The procedure laid down as per provision mention in Maharashtra Right to Information (2nd Amendment) Rules, 2012 dated 31.01.2012 as below:

*"3B. Procedure for seeking inspects of Records :- If after having consider the application filed by the applicants for seeking inspection of records under sub section (1) of section 6 the Public Information Officer find it appropriate, the applicant may be granted permission to inspect the records and if he grants such permission the Public Information Officer shall requisition the record desired by the applicant for perusal, from the concerned section of the department and shall give the same to the applicant for inspection in his presence or in the presence of his authorized representative, during office hours. While inspecting such records, the applicant shall be allowed to use pencil only and the information desired by the applicant shall be noted by him by pencil only and if the applicant bring any writing instruments other than a pencil, he shall deposit the same with the Public Information Officer and thereafter, he shall be allowed to inspect the record. The applicant shall not make any marking on the record by the pencil he is allowed to use during inspection."*

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी / प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई - ४००००५. दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३९६४ / ६५ / ६९. **Email: anilkumar.ukey@merc.gov.in** .

आपला विश्वासू,

(अरूण वाळुंज)
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव